महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ 22 एप्रिल 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 293 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# भारताची बदनामी करणं बंद करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राहुल गांधींवर टीका



राहुल गांधी यांनी परदेशात जाऊन भारताची बदनामी केली, भारतीय लोकशाहीची बदनामी केली. विरोधी पक्षाचे नेते असताना आपल्या देशाची बदनामी करत असतील तर त्यांच्या बद्दल संशय निर्माण होतोय. ते कुणाचा अजेंडा राबवत आहेत? असा सवाल करतानाच जगभरात फिरून भारताची बदनामी करून मते वाढणार नाहीत. जनतेत विश्वासहार्यता वाढवली तरच मते मिळतील. पण ते करण्याऐवजी ते देशाची बदनामी करत आहेत. महाराष्ट्रात हरले, दिल्लीत हरले, हरियाणात हरले. अतिशय बाळबोध प्रकार आहे. त्यांनी जनतेत जावं आणि भारताची बदनामी करणं बंद करावं, असं आवाहन फडणवीस यांनी केलं आहे.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** "राहुल गांधी सातत्याने परदेशात जाऊन भारताची, लोकशाही संस्था आणि संविधानाची बदनामी करत आहेत. निवडणुकीत सातत्याने पराभूत झाल्यामुळे त्यांच्या मनावर परिणाम झालाय," अशी थेट टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

फडणवीस म्हणाले, "विरोधी पक्षाचा नेता म्हणून जर कोणी परदेशात जाऊन देशाचं नाव खराब करत असेल, तर तो कोणाचा अजेंडा राबवतोय, हा संशय निर्माण होतो. त्यांना पराभव पचलेला नाही, म्हणून राहुल गांधी निवडणूक प्रक्रिया आणि मतदार यादीवरच प्रश्न उपस्थित करत आहेत. हा केवळ बालिशपणा आहे."

ते पुढे म्हणाले, "राहुल गांधींनी देशात राहून काम करावं, जनतेत विश्वासार्हता निर्माण करावी. परदेशात फिरून भारताची निंदा करून मते मिळणार नाहीत. महाराष्ट्र, हरियाणा, दिल्ली, कुठेही त्यांना यश मिळालेलं नाही. आता तरी त्यांनी भारताची बदनामी करणं थांबवावं."

दरम्यान, भाजप प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनीही राहुल गांधींवर टीका करताना म्हटलं, "राहुल गांधी हे लोकशाहीविरोधी आहेत. जे भारतीय मतदारांचा विश्वास जिंकू शकले नाहीत, तेच लोक परदेशातून भारताच्या लोकशाही प्रक्रियेवर प्रश्न उभे करत आहेत. जॉर्ज सोरोसच्या अजेंड्यावर राहुल गांधी काम करतायत का?"

काँग्रेस नेते राहुल गांधी हे परदेशात आहेत. अमेरिकेत संवाद साधताना त्यांनी भारतीय निवडणूक प्रक्रियेवर गंभीर आरोप केले होते. भारतीय निवडणूक प्रक्रियेत अनेक समस्या आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत तर वेळ संपल्यानंतरही मतदान झालं. त्याचा डेटा आम्हाला दिलाच नाही, असं सांगत राहुल गांधी यांनी भारतीय निवडणूक आयोग पारदर्शक नसल्याचं स्पष्ट केलं. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. राहुल गांधी यांच्या या विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संताप व्यक्त केला आहे. राहुल गांधी कुणाचा अजेंडा राबवत आहेत? असा संतप्त सवाल देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मीडियाशी संवाद साधत होते. त्यावेळी त्यांनी राहुल गांधी यांच्या विधानाचा समाचार घेतला. ही दु:खद गोष्ट आहे. राहुल गांधी विदेशात जाऊन देशाच्या प्रती, देशाच्या संविधानाने ज्या संस्था तयार केल्या आहेत त्यांच्याबाबत खोटं बोलत आहेत. त्या संस्थांबाबत खोटं पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत. भारतीय लोकशाहीला बदनाम करण्याचं काम करत आहेत. लोकशाहीवर प्रश्न उपस्थित करत आहेत. ते अत्यंत चुकीचं काम करत आहेत. वारंवार निवडणूक हरल्यामुळे त्यांच्या मनावर परिणाम झाला आहे, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.



थोडक्यात महत्वाचे

## ठाण्यातील नालेसफाईच्या कामांना वेग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २१** ठाणे महापालिका क्षेत्रातील पावसाळापूर्व नालेसफाईची दोन टप्प्यात कामे केली जाणार आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यात पाच प्रभाग समिती क्षेत्रातील नालेसफाईची कामे सोमवारपासून सुरू झाली, तर दुसऱ्या टप्प्यातील कामे २५ एप्रिलपासून सुरू होणार आहेत. ठाणे पालिका क्षेत्रातील नऊ प्रभाग समित्याअंतर्गत २७८ मीटर लांबीचे लहान-मोठे नाले आहेत. पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी पालिका दरवर्षी नालेसफाई करून घेते. त्यासाठी कोट्यवधींच्या निधीही खर्च केला जातो, मात्र काही वर्षांपासून ठेकेदारांना बिले वेळेत मिळत नसल्याने तसेच दंडात्मक कारवाईमुळे नालेसफाईच्या शर्यतीतून अनेक ठेकेदार बाहेर पडले आहेत. असे असले तरी पालिकेने नालेसफाईची कामे वेळेत सुरू करून मुदतीत संपवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सोमवारपासून पहिल्या टप्प्यातील नालेसफाईच्या कामाला सुरुवात झाली आहे. कापूरबावडी पोलिस ठाण्यालगत असलेल्या नाल्यांची आयुक्त सौरभ राव यांच्या उपस्थितीत सफाईला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर हरदास नगर, रेल्वेमार्गालगत, ज्ञानसाधना महाविद्यालयाजवळ नाल्याच्या सफाईचे काम सुरू करण्यात आले. या वेळी माजी ज्येष्ठ नगरसेवक संजय भोईर, माजी नगरसेविका निशा पाटील, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, दिनेश तायडे, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सहाय्यक आयुक्त स्मिता सुर्वे, कार्यकारी अभियंता संजय कदम आदी उपस्थित होते.

## मुरबाड : नानासाहेब धर्माधिकारी प्रवेशद्वाराच्या दुरुस्तीची मागणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मुरबाड-प्रतिनिधी मुरबाड शहराच्या मुख्य प्रवेशद्वारावरील उभारलेल्या कमानीवर थोर निरूपणकार महाराष्ट्र भुषण तिर्थरूप डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान असे नाव दिले होते.मात्र काही दिवसांनी धर्माधिकारी या नावातील काही अक्षरे बरेच दिवस झाले गळून पडली आहेत. याबाबत मुरबाड मधील नागरिकांनी तसेच बैठकी तील श्री सदस्यांनी अनेक वेळा नगरपंचायत प्रशासनाला सांगूनही मुरबाड नगरपंचायत प्रशासन कोणतीही दुरुस्तीची भुमिका घेत नसून दुर्लक्ष करीत आहे. नको त्या ठिकाणी लाखो रूपये नगरपंचायत खर्च करत असताना लाखो श्री सदस्यांचे श्रद्धास्थान असलेले महाराष्ट्र भुषण नाना साहेबांच्या नावा बाबत उदासिन आहे. मुरबाड नगरपंचायतच्या उदासिनते बाबत सर्वत्र नाराजी व्यक्त होत असून लवकरात लवकर हे नाव नव्याने लावावे अशी मागणी होत आहे.

## भिवंडी : कचऱ्याच्या ढिगाऱ्यात नवजात बाळाचा मृतदेह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** ठाण्यातील भिवंडी परिसरात बडोदी गावात कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ रविवारी सकाळी एका नवजात बाळाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ माजली. याप्रकरणी अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील तपासला सुरुवात केली. बाळाचा जन्म अनैतिक संबंधातून झाला असावा, असा पोलिसांनी अंदाज वर्तवला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भिवंडी परिसरातील बडोदी गावात रविवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास रहिवाशांना नवजात बाळाचा मृतदेह आढळून आला. त्यानंतर स्थानिक लोकांनी पोलिसांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर पोलिसांचे एक पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी बाळाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जवळच्या शासकीय रुग्णालयात पाठवला.

नारपोली पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी भारतीय न्याय संहिताच्या कलम ९४ (मृतदेहाची गुप्त विल्हेवाट लावून जन्म लपवणे) अंतर्गत अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास पुढे सरकताच अधिक तपशील उघड होतील.

## केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांनी केली उल्हास नदीची पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी सोमवारी कल्याण परिक्षेत्रातील उल्हास नदी व कल्याण (पश्चिम) येथील नाले साफ-सफाईचा पाहणी दौरा केला. या पाहणी दौऱ्यावेळी कल्याण डोंबिवली महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने उल्हास नदीतील जलपर्णी काढण्याचे काम सुरू असून त्यांची पाहणी करून मोहने, गाळेगाव परिसरातील नदीपत्रात येणारे सांडपाणी उपाययोजना काय करता येतील यांचा आढावा घेतला. तसेच उल्हास नदीतील जलपर्णीवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यावर भर देण्यात येईल, अशी माहिती महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पाहणी दौऱ्या समयी दिली. उल्हास नदीमध्ये औद्योगिक कंपन्यांचे केमिकलयुक्त पाणी कोणतीही प्रक्रिया न करता सोडले जात असल्याने नाल्यांमधील जलपर्णी वाढल्यामुळे गाळ साचतो व पावसाळ्यात नाले ओव्हरफ्लो होतात. यावर कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून उल्हास नदी पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. याद्दष्टीकोनातून महानगरपालिकेने नियोजन सुरु केले असल्याबाबत महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी सांगितले आहे. मोहने व गाळेगाव येथील उल्हास नदीला मिळणाऱ्या नाल्यांची पाहणी करण्यात आली,उल्हास नदी मधील जलपर्णी काढण्याचे काम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मार्फत सुरू आहे. आयुक्तांनी या बाबतीत पुढील उपाययोजना करण्याच्या द्दष्टीने डी.पी.आर.करणे बाबत संबंधितांना निर्देशित केले व लवकरात लवकर डि.पी.आर.तयार करून शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येईल असे सांगितले.

क.डो.मनपा आयुक्त यांनी "अ" प्रभागातील लहुजी नगर येथील रस्त्यावरील झोपडपट्टी व चाळीतील सांडपाणी व्यवस्थेची पाहणी केली. कल्याण पश्चिमेतील नाले साफ-सफाई करण्यास सुरुवात झालेली आहे. असल्याने अंबिकानगर येथील नालेसफाईच्या प्रस्तावित कामाबाबत पाहणी केली. त्यानंतर "ब" प्रभागातील अनुपम नगर येथील नाला व चिकन घर येथील नाल्याची पाहणी केली. घनकचरा व्यवस्थापन योग्य प्रकारे सुरू राहण्याच्या द्दष्टीने व नाल्यात कमीत कमी कचरा जाईल असे होण्याच्या द्दष्टीने आयुक्त महोदयांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील तसेच "ब" प्रभागाचे सहा.आयुक्त प्रिती गाडे यांना याबाबत डीप क्लिनिंग करणे बाबत निर्देशित केले.

## जुन्या इमारतींनी संरचनात्मक तपासणी करून घ्यावी

### - आयुक्त मनीषा आव्हाळे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. २१ :** उल्हासनगरमध्ये पूर्वी अनेक इमारतींचे स्लॅब कोसळून जीवितहानी झाली आहे. काही दिवसांपूर्वीही धोकादायक इमारतीचा स्लॅब कोसळल्याने एक जण गंभीर जखमी झाला होता. त्याच पार्श्वभूमीवर आता महापालिकेने नागरिकांना जुन्या इमारतींच्या संरचनात्मक तपासणीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले आहे. संभाव्य दुर्घटनांपासून बचावासाठी नागरिकांनी महापालिकेच्या सूचनांचे तातडीने पालन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पावसाळ्याची चाहूल लागताच उल्हासनगर महापालिका नागरिकांच्या सुरक्षेसाठी सज्ज झाली आहे. शहरात मागील काही वर्षांमध्ये २० ते २५ वर्षे जुन्या इमारतींचे स्लॅब कोसळून अनेकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे आता महापालिकेने वेळेत पावले उचलत आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांनी जाहीर आवाहन केले आहे. उल्हासनगर शहरातील १० वर्षांपेक्षा जुन्या इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी तातडीने आपल्या इमारतीची 'संरचनात्मक तपासणी' (स्ट्रक्चरल ऑडिट) करून घ्यावी आणि तपासणी अहवाल प्रभाग समिती कार्यालयात सादर करावा, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. संरचनात्मक तपासणीची काळजी घेतल्यास भविष्यातील जीवित व वित्तहानी टाळता येईल. महापालिका आपली जबाबदारी पार पाडत असली, तरी नागरिकांनीही पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी संरचनात्मक तपासणी करून इमारतींची सुरक्षितता तपासून घेणे, महत्त्वाचे आहे. प्रत्येक नागरिकाने या सूचना गांभीर्याने घेऊन महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी केले आहे. धोकादायक इमारतींची यादी उल्हासनगर महापालिकेच्या www.umc.gov.in या संकेतस्थळावर 'लिस्ट ऑफ डेन्जरस बिल्डिंग' या विभागात प्रसिद्ध करण्यात आली आहे. आपल्या इमारतीचे नाव या यादीत आहे की नाही हे नागरिकांनी त्वरित तपासावे. उल्हासनगर महापालिका पॅनेलवरील अधिकृत संरचनात्मक अभियंत्यांची यादीही संकेतस्थळावर उपलब्ध केली आहे. फक्त या अधिकृत अभियंत्यांकडूनच तपासणी करण्याचे आवाहन केले आहे.

> उल्हासनगरमध्ये काही वर्षांत जुन्या इमारतींचे स्लॅब कोसळून जीवित आणि वित्तहानी झालेली आहे. नागरिकांची सुरक्षितता आमची सर्वोच्च जबाबदारी आहे. त्यामुळे १० वर्षांपेक्षा जुन्या इमारतींनी तत्काळ संरचनात्मक तपासणी करून घ्यावी. धोक्याची कोणतीही लक्षणे दिसताच तत्काळ कृती करणे आवश्यक आहे. महापालिकेने संबंधित यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. नागरिकांनी जबाबदारीने पुढाकार घ्यावा. संकट टाळायचे असेल, तर इशाऱ्याची वाट पाहू नका.
>
> **- मनीषा आव्हाळे, आयुक्त, उल्हासनगर महापालिका**

## समृद्धीवरील अपघातग्रस्तांच्या मदतीला धावणार बाप्पा

### टिटवाळ्याच्या श्री महागणपती रुग्णालयातर्फे समृध्दी महामार्गावर रुग्णवाहिकेसह दवाखाना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याणसह ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात रुग्ण सेवा देण्यात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील टिटवाळा येथील क्रिएटिव्ह ग्रुप संचलित वैद्यकीय सुविधांनी अद्ययावत श्री महागणपती रुग्णालयातर्फे समृध्दी महामार्गावर दवाखाना आणि रुग्णवाहिकेची (कार्डियाक) सुविधा रविवारी सुरू करण्यात आली.

एसबीआय फाऊंडेशन पुरस्कृत एसबीआय संजीवनी निरंतर सेवा रुग्णवाहिका आणि मेकशिफ्ट क्लिनीक प्रकल्प यांचे या दवाखाना आणि रुग्णवाहिकेसाठी महत्वाचे योगदान आहे. एसबीआय फाऊंडेशनच्या पुढाकारातून समृध्दी महामार्गावर सुरू होणारा हा पहिलाच अद्ययावत दवाखाना आहे. या दवाखान्यातील रुग्ण सेवा पूर्णपणे मोफत असणार आहे. या दवाखान्यात अनुभवी डॉक्टर, परिचारिका, रुग्णसेवक यांसह वैद्यकीय उपचाराच्या सर्व सुविधा उपलब्ध असणार आहेत, अशी माहिती क्रिएटिव्ह ग्रुपचे अध्यक्ष आणि श्री महागणपती रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत बापट यांनी दिली.



> महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने यापूर्वीच समृध्दी महामार्गावर प्रत्येक टप्प्यांवर सुसज्ज रुग्णवाहिका सेवा, तात्काळ अपघात प्रतिसाद पथके तैनात ठेवली आहेत. या यंत्रणाही उत्तम काम या महामार्गावर करत आहेत. या यंत्रणेला एक सहाय्य म्हणून एसबीआय संजीवनी निरंतर रुग्णवाहिका (कार्डियाक रुग्णवाहिका) सेवा, दवाखाना श्री महागणपती रुग्णालयाच्या माध्यमातून सिन्नर येथील मेहकर इंटरचेज ते छत्रपती संभाजीनगर येथील गोंदे इंटरचेज भागात सक्रिय असणार आहे,
>
> ■ विक्रांत बापट
> मुख्य कार्यकारी अधिकारी
> महागणपती रुग्णालय

मुंबई ते नागपूर या ७२० किलोमीटर लांबीच्या समृध्दी महामार्गामुळे महाराष्ट्रातील अनेक शहरे, गावे, तीर्थक्षेत्र जोडली गेली आहेत. विना अडथळा, कमी वेळेत अंतर कापून होत असल्याने मुंबई, नागपूरसह या महामार्गालगतच्या शहर, गावांमध्ये राहणार नागरिक समृध्दी महामार्गावरील प्रवासाला पसंती देत आहेत. या महामार्गावरील वाहन भार वाढला आहे. या महामार्गावर प्रवास सुरू होताच गस्तीवरील पोलीस वाहन चालक, प्रवाशांना सुखरूप प्रवासाठीच्या योग्य सूचना देतात. तरीही या महामार्गावरून प्रवास करताना वाहनातील तांत्रिक बिघाड, काही वाहन चालक प्रमाणित वेगापेक्षा अधिकच्या वेगाने वाहने चालवितात. त्यामुळे अपघाताची शक्यता असते किंवा अन्य काही कारणांमुळे अपघात झाला तर अशा प्रवाशांना तात्काळ वैद्यकीय मदत घटनास्थळी व्हावी, या उद्देशातून हा दवाखाना, रग्णवाहिकेची सुविधा समृध्दी महामार्गावर सुरू करण्यात आली आहे, असे अध्यक्ष बापट यांनी सांगितले. मेहकर मार्ग येथे ही सुविधा उपलब्ध असेल. परिसरातील खेड्यांना यामाध्यमातून रुग्ण सेवा देण्यात येणार आहे.

या रुग्णवाहिका, दवाखान्याचे लोकापर्ण केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, एसबीआय फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक संजय प्रकाश यांच्या हस्ते मेहकर इंटरचेज रविवारी झाले. यावेळी एसबीआय कॅपचे ट्रस्टी अरबेंदु मुखोपाध्याय, मनुष्यबळ विकास प्रमुख अरविंद देव्हारे, कामगार आयुक्त नीलेश देठे, विशेष कार्य अधिकारी राजाराम चव्हाण, साहाय्यक व्यवस्थापक शुभम कुमार उपस्थित होते. एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांनी या उपक्रमाला परवानगी दिल्याबद्दल त्यांचे यावेळी कौतुक करण्यात आले.

## कल्याण पूर्व शिवसेनेचा महावितरणवर मोर्चा


दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** - मागील काही महिन्यांपासून दररोज कल्याण पूर्व भागातील वीज पुरवठा कोणतीही पूर्वसूचना न देता खंडित केला जातो. वीज पुरवठा खंडित केल्याची, झाल्याची कोणतीही कारणे महावितरण कर्मचारी वेळेवर देत नाहीत. आता तर कडक उन्हाचे दिवस सुरू आहेत. घरात बसुनही उष्णतेने शरीर भाजुन निघत आहे. अशा परिस्थितीत कल्याण पूर्वेतील वीज पुरवठा खंडित होत आहे. या सततच्या त्रासाला कंटाळुन सोमवारी शिवसेना ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी महावितरणच्या कल्याण पूर्व टाटा पॉवर येथील कार्यालयावर मोर्चा काढला. कल्याण पूर्वेतील महावितरणचा खंडित वीज पुरवठ्याचा खेळ थांबला नाही. कोणतीही पूर्व सूचना न देता यापुढे वीज पुरवठा खंडित केला तर शिवसेना ठाकरे गटाकडून नागरिकांना होणाऱ्या या त्रासामुळे महावितरणच्या कल्याण पूर्वेतील सर्व कार्यालयांना टाळे ठोकले जाईल, असा इशारा उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण पूर्व जिल्हाप्रमुख धनंजय बोडारे, कल्याण पूर्व शहरप्रमुख शरद पाटील आणि शिवसैनिकांनी महावितरणच्या कल्याण पूर्वेतील कार्यकारी अभियंता जगदीश बोडखे यांना दिला.

अनेक महिन्यांपासून कल्याण पूर्वेत विजेचा लपंडाव सुरू आहे. वेळी अवेळी वीज पुरवठा खंडित होतो. यासंदर्भात महावितरण कार्यालयात संपर्क केला की त्यांचे नागरी सुविधा क्रमांक सतत व्यस्त असतात. अनेक नोकरदार घरातून कार्यालयीन कामे करतात. वीज पुरवठा खंडित झाला की त्यांचा लॅपटॉप, इंटरनेट यंत्रणा बंद पडते. त्यामुळे नोकरदार वर्गाचे हाल होतात. रुग्णालये, अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कार्यालयांमध्ये प्रश्न उपस्थित होतात. आता तर कडक

उन्हाचे दिवस सुरू आहेत. एक क्षण वीज पुरवठा बंद झाला तरी घरात थांबणे शक्य होत नाही. रात्रीच्या वेळेत वीज पुरवठा गेला की रुग्ण, वृध्द, लहान बाळे यांचे सर्वाधिक हाल होतात. थंड हवा म्हणून रात्रीच्या वेळेत दरवाजा उघडा ठेवला की घरात डास येतात. वीज पुरवठा खंडित करणारी छाटणी केलेली झाडे, फांद्या रस्तो रस्ती पडून आहेत. अशा अनेक कारणांमुळे कल्याण पूर्वेतील नागरिक महावितरणच्या कामाविषयी नाराज होते. महावितरणच्या सततच्या वीज पुरवठा खंडित विषयी वाढत्या तक्रारी शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांकडे आल्यावर पदाधिकाऱ्यांनी महावितरण कार्यालयावर मोर्चा काढून याप्रकरणी जाब विचारण्याचा निर्णय घेतला. सोमवारी सकाळी जिल्हाप्रमुख धनंजय बोडारे, शहरप्रमुख शरद पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिक महावितरण कार्यालयावर धडकले.

## वाचक मनोगत

# शैक्षणिक गुणवत्तेत मराठी शाळा आघाडीवर

मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की, विद्यार्थी निर्धास्त होतात कारण पुढील दीड दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. पण याच दोन महिन्यात पालकांना वेध लागतात ते आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाचे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक म्हणजे ज्यांचे पाल्य पहिलीत दाखल होणार आहेत अशा पालकांमध्ये तर मोठा संभ्रम असतो. आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल करायचे की इंग्रजी शाळेत दाखल करायचे याबाबत त्या पालकांमध्ये मोठा संभ्रम असतो. मुलांचे शिकण्याचे माध्यम मराठी असावे की इंग्रजी यावर मग कुटुंबात मोठा खल होतो. नातेवाईक, शेजार पाजारी, मित्रमंडळी अशा पालकांना वेगवेगळा सल्ला देत असतात अशा वेळी कोणता निर्णय घ्यावा असा मोठा पेच या पालकांना पडतो. इंग्रजी भाषा ज्ञान भाषा असल्याने इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो आणि खरी फसगत इथेच होते. इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घ्यावे असे काही नाही मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही मुल चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकू शिकू शकते. आज जे उच्चपदावर बसलेले नामवंत व्यक्ती आहेत ते सर्व मराठी माध्यमातूनच आणि सरकारी शाळेतूनच शिकले आहेत. खरे तर आज जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेतून दर्जेदार शिक्षण दिले जाते. आज मराठी माध्यमांच्या शाळा देखील कात टाकत आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत गुणवान, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक आहेत. सर्व शिक्षक डी एड, बी एड, एम एड असे उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. हे शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतात. मराठी माध्यमांच्या शाळेत ई लर्निग, ॲक्टिव्हिटी बेस लार्निंग च्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो शाळा आय एस ओ नामांकन प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल स्कूल, टॅब स्कूल या संकल्पना या शाळेतही रुजत आहेत. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या शाळेतही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गुणवत्तेच्या बाबतीतही या मराठी शाळा कोठे कमी नाहीत. ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीच असतात. नुकताच जवाहर नवोदय परीक्षेचा निकाल घोषित झाला. यात जिल्हा परिषद शाळेतीलच सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. याशिवाय मंथन, प्रज्ञाशोध या स्पर्धा परीक्षेतही मराठी शाळांचाच डंका वाजतो. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण दिले जाते. मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्त्या मिळतात. गुणवत्तेसह सह शालेय उपक्रमातही मराठी शाळा आघाडीवर असतात. मराठी शाळेत पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, सहल, वनभोजन, क्षेत्रभेट, मातृ - पितृ पूजन, आनंदी बाजार, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी, विविध स्पर्धा सर्व महापुरुषांच्या जयंत्या असे विविध उपक्रम राबवले जातात. आता मराठी माध्यमांच्या सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी दाखल होत आहेत. आता तर सर्वच मराठी शाळेत सीबीएएससी चा अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे म्हणजे जे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेत मिळते तेच शिक्षण आता मराठी माध्यमांच्या शाळेतही मिळणार आहे तरीही शहरातील पालकांना अजूनही इंग्रजी शाळेचा मोह सुटत नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून पालक त्या शाळांच्या नादी लागत आहेत. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी शिक्षणाचा बाजार केला आहे . अगदी के जी च्या प्रवेशासाठीही लाखोंची देणगी घेतली जाते शिवाय इमारत निधी, ट्रस्ट निधी तसेच वर्षभर चालणारे वेगवेगळे कार्यक्रम या माध्यमातून पैसे उकळले जातात. पालकांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी या शाळा वेगवेगळे फंडे शोधत असतात. जर एखाद्या पालकांनी फी भरण्यास उशीर केला तर विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यापर्यंत मजल या शाळांची जाते. कोरोना काळात फी भरता न आलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप काही इंग्रजी शाळांनी केले आहे. अनेक इंग्रजी शाळा शैक्षणिक साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. २००३ मध्ये उच्च न्यायलयाने दिलेल्या निकालात शैक्षणिक साहित्य शाळेकडूनच किंवा ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही असे म्हंटले आहे. सरकारनेही वेळोवेळी तसे आदेश काढले आहेत पण या शाळांना सरकारी आदेशाचा आणि न्यायालयाच्या निकालाचा विसर पडला आहे न्यायालये व सरकारला न जुमानता आपली शैक्षणिक दुकानदारी चालवणाऱ्या या शाळांना चाप लावायचा असेल तर पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत दाखल करण्याऐवजी मराठी माध्यमांच्या शाळेत दखल करावे

**श्याम ठाणेदार - दौंड जिल्हा पुणे**

# बाळासाहेबांना धमक्या देऊन पक्ष संघटना काबीज केली

## खासदार नरेश म्हस्के यांचा गौप्यस्फोट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी ज्यावेळी राज ठाकरे, गणेश नाईक, नारायण राणे यांच्यावर जबाबदारी सोपवण्याचा निर्णय घेतला तेव्हा उबाठाने घर सोडून जाऊ, अशा धमक्या दिल्या आणि पक्ष संघटना काबीज केली, अशी घणाघाती टीका शिवसेना खासदार व प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी आज केली. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीवर त्यांना पोटदुखी झालीय, अशी टीका खासदार म्हस्के यांनी केली. दोघांचे पक्ष वेगळे असले तरी राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे कायम संपर्कात असतात, असे खासदार म्हस्के म्हणाले. नवी दिल्ली येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

### राऊत यांना धर्मवीर दिघेंचा कायम मत्सर

**राऊत यांना धर्मवीर आनंद दिघेंबाबत कायम मत्सर होता. लोकप्रभामध्ये संत्रा राऊत यांनी दिघेंची मुलाखत घेऊन जो लेख लिहला त्यामुळे दिघेंना टाडाखाली अटक झाली होती, असा गौप्यस्फोट खासदार नरेश म्हस्के यांनी यावेळी केला. धर्मवीर दिघे यांचे नाव देखील घेण्याचा अधिकार तुम्हाला नाही, असे खासदार म्हस्के यांनी संत्रा राऊत यांना खडसावले. लोकसभा निवडणुकीवेळी उबाठा गटाने ठाण्यातील लोकांना आवाहन केले होते की धर्मवीर आनंद दिघेंचा खरा शिष्य कोण, मात्र राजन विचारे त्यांच्या वॉर्डमध्ये देखील पिछाडीवर राहिले. ठाण्यातील लोकांनी धर्मवीर यांचा खरा शिष्य कोण हे दाखवून दिले, असे खासदार म्हस्के म्हणाले.**



ते पुढे म्हणाले की, राज ठाकरे शिवसेनेत होते तेव्हा त्यांच्या नावाने तुम्ही कायम बोटं मोडली. जिथे शिवसेना कमकुवत आहे तिथं मला जबाबदारी द्या, अशी मागणी राज ठाकरे यांनी केली होती. तेव्हा बाळासाहेब देखील राज ठाकरेंवर जबाबदारी सोपवणार होते, मात्र त्यावेळी उबाठाने घर सोडून जाण्याची धमकी बाळासाहेबांना दिली आणि पक्ष संघटना काबीज केली, असा गौप्यस्फोट खासदार म्हस्के यांनी केला. नारायण राणे यांच्याबाबतीत देखील त्यांनी धमकीचे अस्त्र वापरले होते. ते पुढे म्हणाले की, राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वात एकत्र काम केले होते. राज ठाकरे आणि शिवसेना एकाच विचाराचे आहेत. मात्र ज्या बाळासाहेबांनी कायम काँग्रेसला विरोध केला त्या नेत्यांच्या उंबरठ्या बाहेर तुम्हाला उभे राहावे लागते, अशी टीका त्यांनी उबाठावर केली.

खासदार म्हस्के पुढे म्हणाले की, बाळासाहेबांच्या तोंडी बनावटगिरी करुन एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करता, कारण थेट टीका करण्याची तुमच्यात हिंमत नाही. नकली आवाज देऊन बाळासाहेबांचा वापर करताय कारण तुम्ही बनावट आहात, अशी टीका खासदार म्हस्के यांनी उबाठा गटावर केली. विधानसभेला त्यांनी १०० जागा लढल्या व केवळ २० जागी निवडून आले आणि शिवसेनेने ८० जागा लढल्या आणि ६० जागा जिंकल्या, यावरुन खरी शिवसेना कोण हे लोकांनी दाखवून दिले, असे ते म्हणाले. नाशिक मेळाव्यात उपस्थित लोकांमधील बहुतांशजण महिनाभरात तुम्हाला सोडून जातील, असा दावा खासदार म्हस्के यांनी केला.

राऊत यांनी स्वत:ची तुलना छत्रपती संभाजी महाराजांबरोबर केली यावर खासदार म्हस्के यांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराजांशी तुलना करणारे तुम्ही कोण, तुमची योग्यता काय? छत्रपती संभाजी महाराजांनी हिंदुत्वासाठी बलिदान दिले आणि तुम्ही खुर्चीसाठी हिंदुत्व सोडले, मुस्लिम मतांसाठी मुल्ला मौलवींना पायघड्या घातल्या होत्या, हा छत्रपती संभाजी महाराजांचा अपमान आहे, असे ते म्हणाले. ममता बॅनर्जींना मातोश्रीवर बोलावून सँडविच खायला घालता, मात्र बंगालमध्ये हिंदूंवर सुरु असलेल्या अत्याचारावर तुम्ही एक शब्द काढला नाहीत, अशी टीका खासदार म्हस्के यांनी केली. महापालिका निवडणुका रखडल्याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे जबाबदार आहेत, असा आरोप खासदार म्हस्के यांनी केला. मुंबई महापालिकेतील पैसा खाऊन तुम्ही गब्बर झाला आहात. कोविड काळातील खिचडी, बॉडीबॅग खरेदी, पत्राचाळ पुनर्विकास घोटाळा यावर संत्रा राऊत यांनी बोलावे, असे प्रतिआव्हान खासदार म्हस्के यांनी दिले.

# डीएड चे विद्यार्थी चाळीस वर्षांनी एकत्र भेटून साजरा केला आनंदोत्सव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)** शासकीय अध्यापक विद्यालय पनवेल येथील सन १९८३ते ८५ या बॅचचे माजी विद्यार्थी तब्बल चाळीस वर्षांनी एकत्र भेटले. या सर्व विद्यार्थ्यांचे स्नेह-संमेलन आगरी मंच पेण येथे मोठ्या थाटामाटात नुकतेच संपन्न झाले. सुरवातीला ईशस्तवन स्वागतपद्य गायन करून उपस्थितांचे हस्ते गणेश पुजन झाले. सुधीर मांडवकर आणि सौ. कुंदा म्हात्रे यांनी वैज्ञानिक पध्दतीने बिन वातीचा व बिन तेलाचा दिवा पाणी ओतून प्रज्वलीत करुन कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. त्यानंतर दिवंगत



सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अशोक पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. चंद्रकांत म्हात्रे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचे महत्व विषद केले. सर्वांनी "40" वर्षानंतर भेटल्या बद्दल आनंद व्यक्त केला. यावेळी ४० वर्षातील गमती जमती व सेवा करताना आलेले चांगले वाईट अनुभव विशद करून मनोरंजन पद्धतीने आनंद व्यक्त केला.प्रमुख पाहुणे म्हणून पांडुरंग म्हात्रे होते.अध्यक्षस्थान भिकाजी तांबोळी यांनी भूषवले,तर सुरेश जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत म्हात्रे, अशोक पाटील,कल्पना म्हात्रे, प्रदीप म्हात्रे यांनी खूप मेहनत घेतली,सुधीर मांडवकर यांनी कार्यक्रमाचे सुरेख चित्रीकरण केले. अशोक पाटीलसरांनी पसायदान गायन करून कार्यक्रमाची सांगता केली.

# जिल्ह्यातील पक्षी प्रेमींना पानथळ पक्षी पाहण्याची पर्वणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : ठाण्यात खाडी परिसरात अतिक्रमण करून जैवविविधा नष्ट होत असताना ठाणे पूर्व परिसरात खाडी भाग मोकळा श्वास घेतो आहे. या ठिकाणी विविध पक्ष्यांची मादियाळी बघायला मिळत असून, हजारो किलोमीटर अंतर पार करून आलेल्या ठिपक्यांचा टिलवा पक्षीप्रेमींसाठी पर्वणी ठरत आहे. ठाणे शहराला २७ किमीचा खाडी किनारा लाभला असून, कांदळवन आणि खाडीच्या पाणथळ जागेत जैव विविधता मोठ्या प्रमाणात बघायला मिळते आहे. मात्र खाडीतील अतिक्रमण प्राणी पक्ष्यांसाठी धोक्याची घंटा आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने एका बाजूला ऱ्हास होत आहे. परंतु ठाणे पूर्व भागात पर्यावरणासाठी सुखद घटना घडली आहे.शढ दरवर्षीप्रमाणे यंदाही स्थलांतराच्या ऋतूमध्ये विविध परदेशी पाहुणे आपला मुक्काम खाडी भागात करतात. यंदाचा विशेष पाहुणा म्हणजे हा ठिपक्यांचा टिलवा हा पाणथळ पक्षी मिठागर परिसरात बघायला मिळत असल्याची माहिती पक्षी अभ्यासक वीरेंद्र घरत यांनी दिली.**

# अनधिकृत संस्था आढळल्यास संपर्क साधा

## महिला व बाल विकास आयुक्तालयाचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण ( प्रतिनिधी)** पुणे जिल्ह्यातील आळंदी व ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे बेकायदेशीर बालगृहे, वसतिगृहे, अनाथाश्रम चालविले जात आहेत. तसेच या संस्थांमध्ये बालकांना अनधिकृतपणे डांबून ठेवण्यात येवून त्यांचे शारिरीक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या घटना घडत असल्याबाबतच्या बातम्या प्रसिध्द झाल्या असून याबाबत आपल्या जिल्ह्यात आसपासच्या परिसरामध्ये अनधिकृत संस्था आढळून आल्यास जिल्ह्यातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तसेच चाईल्ड हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक 1098 या वर संपर्क साधून बालकांवरील शारिरीक तसेच लैंगिक अपराधास प्रतिबंध करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन नयना अर्जुन गुंडे, आयुक्त (भा.प्र.से) महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे यांनी केले आहे.ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम 2015 आणि सुधारित अधिनियम 2021 तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम 2018 मधील तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्या आहेत.बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम 2015 आणि सुधारित अधिनियम 2021 मधील कलम 42 नुसार मान्यता तथा सोबतच्या नोंदणी प्रमाणपत्राप्रमाणे नोदणी प्रमाणपत्र प्राप्त नसलेली संस्था अथवा अशी संस्था चालविणाऱ्या व्यक्तीला 1 वर्ष कारावास तसेच रुपये 1.00 लक्ष पेक्षा कमी नसेल एवढा दंड किंवा दोन्हीही करण्यात येईल अशी तरतुद नमूद करण्यात आले आहे.

# हिंदी भाषा सक्तीकरणाला विरोध का ?

महाराष्ट्रात आता पहिल्या इयत्तेपासून हिंदी भाषा शिकवणे अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 2024 राज्य शालेय आराखड्याद्वारे तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयानुसार आता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्लिशसह हिंदी ही तृतीय भाषा म्हणून शिकवण्यात येणार आहे. हा निर्णय मराठी आणि इंग्रजी दोन्ही माध्यमांच्या शाळांना लागू असेल. त्याचप्रमाणे येत्या जूनमध्ये सुरू होत असलेल्या शैक्षणिक वर्षापासून याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे यांच्यामार्फत तयार करण्यात आलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) 2024 आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) 2024 यातून सुचवलेल्या तरतुदींना मान्यता मिळून त्या टप्प्याटप्प्याने लागू करण्याचे सरकारने जाहीर केले आहे. त्यामध्येच हा हिंदी शिक्षणाचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदी सक्तीला विरोध केला आहे. या निर्णयावर राजकीय तसेच विविध स्तरांमध्ये प्रतिक्रिया उमटत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी इशारा देत म्हटलं, "महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा शिकण्याची सक्ती इथे खपवून घेतली जाणार नाही. शालेय अभ्यासक्रमातील हिंदीची पुस्तकं दुकानांमध्ये विकू दिली जाणार नाहीत आणि शाळांना देखील ती पुस्तकं विद्यार्थ्यांना वाटू दिली जाणार नाहीत, याची नोंद शाळा प्रशासनाने घ्यावी." तर हा निर्णय म्हणजे मराठी भाषकांच्या अस्मितेवर घाला आहे, असं मत काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केलं.

'संपर्कसूत्र तयार करण्यासाठी हिंदी एक भाषा आहे. ती संपर्कसुत्राची भाषा आहे. त्यामुळे हिंदीचा विचार या नव्या आराखड्यात केला गेला', असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. कोणाला इंग्लिश किंवा इतर भाषा शिकायच्या असतील तर मनाई नाही, असंही ते म्हणाले.

### नव्या निर्णयावर जोरदार टीका

हिंदी भाषा पहिलीपासून शिकवण्याच्या या निर्णयावर चौफेर टीका होत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने याविरोधात उघड भूमिका घेतली असून मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी समाजमाध्यमावर पोस्ट करत 'संघर्ष अटळ आहे', असं जाहीर केलं.

- या पोस्टमध्ये राज ठाकरे लिहितात, "राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा 2024 नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. मी स्वच्छ शब्दांत सांगतो की, ही सक्ती महाराष्ट्र नवनिर्माण सेना खपवून घेणार नाही. सरकारचं सध्या जे सर्वत्र 'हिंदीकरण' करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, ते या राज्यात आम्ही यशस्वी होऊ देणार नाही."
- ते पुढे लिहितात, "हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती देशातील इतर भाषांसारखी एक राज्यभाषा आहे. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची ? तुमचं त्रिभाषेचं सूत्र जे काही आहे, ते सरकारी व्यवहारांपुरतंच मर्यादित ठेवा, त्याला शिक्षणापर्यंत आणू नका. या देशात भाषावार प्रांतरचना झाली, आणि ती इतकी वर्ष टिकली. पण आत्ताच ही दुसऱ्या प्रांताची भाषा इथे महाराष्ट्रावर लादण्याचे प्रकार का सुरू झालेत?"
- "भाषावार प्रांतरचनेच्या तत्वालाच हरताळ फासला जात आहे. प्रत्येक भाषा ही सुंदरच असते आणि तिच्या घडण्याच्या मागे एक दीर्घ इतिहास असतो, परंपरा असते. ती ज्या राज्याची भाषा असते, त्या राज्यात तिचा सन्मान राखलाच गेला पाहिजे."
- "महाराष्ट्रात जसा मराठीचा सन्मान इतर भाषिकांकडून राखला गेला पाहिजे, तसा सन्मान इतर राज्यात त्या भाषेचा सर्व भाषिकांकडून राखला गेला पाहिजे. अगदी इतर राज्यात राहणाऱ्या मराठी जनांनी त्या राज्याची भाषा आपली मानली पाहिजे हा आमचा आग्रहच आहे. पण हे सोडून या देशाची भाषिक परंपराच खिळखिळी करणार असाल तर ते आम्हाला मान्य नाही.

# भाजपाच्या मंडल अध्यक्ष पदी वीस जणांची निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** कल्याण लोकसभा परीक्षेत्रात भाजपा मंडल अध्यक्ष म्हणून वीस जणांची निवड करण्यात आली. कालखंडात मंडल अध्यक्ष पदांसाठी युवांना प्राधन्य देण्यात आले आहे. परिणामी घराघरात संघटना वाढण्यासाठी हातभार लागणार असून भाजपा पक्ष वाढीला याचा मोठा फायदा होणार असल्याची चर्चा पदाधिकाऱ्यांमध्ये झाली.






**पक्षाने पुढची फळी तयार करण्यासाठी युवकांना संधी दिली आहे. त्याच्या मागे पक्ष नेतृत्व खंबीरपणे उभे आहे. माझ्यासारख्या एका साध्या कार्यकर्त्याला मंडल अध्यक्ष पद दिले आहे त्यामुळे पक्ष वाढण्यासाठी आम्ही काम करू. ■ मितेश पेणकर**

भाजपाने राज्यभरात नवीन मंडल अध्यक्षाची रविवारी निवड केली. राज्यभरात ११९६ जणांची मंडल अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. कल्याणमध्ये पूर्वी 9 मंडल संख्या होती त्याची संख्या वाढून आता वीस मंडल करण्यात आली आहेत. त्यात डोंबिवली, कल्याण ग्रामीण, कल्याण पूर्व, कल्याण पश्चिम आणि अंबरनाथ विधानसभा या पाच विधानसभांचा समावेश आहे. त्यामध्ये डोंबिवली पूर्व मधून मितेश पेणकर, डोंबिवली पश्चिममधून पवन पाटील आणि प्रिया जोशी, कल्याण ग्रामीणमधून मंदार टावरे, कर्ण जाधव, धनाजी पाटील, सुनिल म्हसकर, आशिष चौधरी, कल्याण पश्चिम मध्ये अमित धाक्रस, स्वप्नील काठे, रितेश फडके, शक्तीवान भोईर,नवनाथ पाटील, कल्याण पूर्वमध्ये मितेश म्हात्रे, विजय उपाध्याय, समीर भांडारी, संतोष शेलार आणि अंबरनाथ विधानसभा मतदार संघात पूर्वेला विश्वजीत गुलाबराव करंजुले, पश्चिमेला प्रजेश तेलंगे आणि लक्ष्मण पंत याची निवड करण्यात आली आहे. माजी मंत्री जगन्नाथ पाटील, माजी उपमहापौर राहूल दामले, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश सरचिटणीस शशिकांत कांबळे यांच्या उपस्थितीत सर्व नियुक्ती जाहीर करण्यात आली. यावेळी समीर चिटणीस, मुकुंद पेडणेकर, प्रकाश पवार, रेखा चौधरी यांच्यासह अनेक भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठय़ा संख्येने उपस्थित होते.

राहूल दामले म्हणाले, एखादा छोटय़ातील छोटा कार्यकर्ते मंडल अध्यक्ष पदांपर्यत येतो. त्यातूनच नेतृत्व तयार होते. हे पक्षाचे धोरण आहे. मंडल अध्यक्ष होणे हा बहुमान आहे. शंभर बूथसाठी एक अध्यक्ष ही संकल्पना भाजपाने राबविली आहे. हे सर्व मंडल अध्यक्ष पक्षाचा मोठया प्रमाणावर विस्तार करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शशिकांत कांबळे म्हणाले, भाजपा पक्षात निष्ठावंत कार्यकत्याला संधी दिली जाते. पक्षाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शंभर बूथाला एक अध्यक्ष दिला अशा पध्दतीने रचना केली आहे. भाजपाचे काम म्हणजे एक प्रकारे राष्ट्राचे काम आहे. हे काम करणे स्वाभिमानाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. भाजपा हा एक परिवार आहे.

मंदार टावरे : भाजपा आणि आयरे गाव यांचे एक वेगळे नाते आहे. माजी मंत्री जगन्नाथ पाटील हे आयरे गावचे भूमीपुत्र आहे. तोच वारसा भाजपाचा येथे सातत्याने सुरू आहे. कल्याण ग्रामीण मधील सुनिल नगर, म्हात्रे नगर,संगीतावाडी हा आयरे गावाचा भौगोलिक परिसर आहे. त्यामुळे येथे नागरिक परिचित आहे. पक्षाने जो विश्वास माझ्यावर दाखविला आहे. तो सार्थ ठरविण्याचा प्रयत्न करीन. या परिसरात पक्ष आणखीन मजबूत करण्यासाठी काम करीन.



# राज्यातील काही जिल्ह्यांना हिटवेव्हचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नागपूर :** भारतात सगळीकडेच उष्णतेची लाट पसरली असून हवामान विभागाने पुढील काही दिवसांत राजस्थान, मध्य प्रदेश आणि विदर्भातील अनेक भागात अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता वर्तवली आहे. बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यांमध्ये प्रचंड उष्ण हवामान राहणार आहे. तर पुणे, सोलापूर जिल्ह्यातही आज उष्ण व दमट हवामानाचा इशारा देण्यात आला आहे.

# शिरवली काकडपाडा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न!




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** -प्रतिनिधी मुरबाड तालुक्यातील शिरवली काकडपाडा येथे मानव सेवा सामाजिक संस्थे तर्फे आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिरात 200 रुग्णांची तपासणी करण्यात आली. मानव सेवा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुरेश बांगर यांनी हे मोफत आरोग्य शिबिर नागरिकांसाठी आयोजित केले होते. यामध्ये रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. डॉक्टर पुनम डोंगरे , डॉक्टर ऋतुजा यादव , डॉक्टर अश्विनी जंगम व महागणपती हॉस्पिटल नर्सेस , स्टाफ यांनी सहभाग घेतला. गावचे पोलीस पाटील हर्षल घागस , दत्तात्रय म्हाडसे , लक्ष्मण घागस, धनाजी म्हाडसे व काकड पाडा शिरवली परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने शिबिरासाठी उपस्थित होते.

# कल्याण-टिटवाळ्यात आज पाणी नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** एकीकडे सूर्य आग ओकत असताना दुसरीकडे कल्याण डोंबिवलीकरांना पाण्याच्या समस्येला तोंड द्यावं लागत आहे. उल्हास नदीवरील मोहिली येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या मुख्य जलवाहिन्यांवर प्रवाह मोजणी मीटर बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. म्हणून कल्याण, टिटवाळा परिसराचा पाणी पुरवठा उद्या (दि २२) बंद राहणार आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, उद्या (दि २२) कल्याण, टिटवाळा परिसराचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. कल्याण



डोंबिवली पालिकेच्या उल्हास नदीवरील मोहिली येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या अशुध्द आणि शुध्द पाणी पुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिन्यांवर प्रवाह मोजणी मीटर बसविण्याचे काम उद्या (दि २२) करण्यात येणार आहे. या कामासाठी नऊ तासाचा कालावधी लागणार असल्याने या जलवाहिन्यांवरून पाणी पुरवठा होणाऱ्या कल्याण, टिटवाळा परिसराचा पाणी पुरवठा सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा या वेळेत बंद राहणार आहे, मंगळवारी दिवसभर पाणी पुरवठा बंद राहणार असल्याने दुसऱ्या दिवशी कमी दाबाने पाणी पुरवठा होण्याची शक्यता विचारात घेऊन नागरिकांनी एक दिवस पुरेल इतका पाणी साठा करून ठेवावा, तसेच पाण्याचा अपव्यय टाळा, असे आवाहन कल्याण महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागातर्फे करण्यात आले आहे.



**मंगळवार**
**२२ एप्रिल २०२५**

**मेष**
विवाहित लोक आज कार्यक्रमाला जातील. नवीन व्यवसायात पालकांचे मत प्रभावी ठरणार आहे.

**वृषभ**
आज तुम्हाला काही अनुभवी लोक भेटतील. ज्यांच्याकडून तुम्हाला चांगला सल्ला मिळेल.

**मिथुन**
नातेवाईक आज नवीन भेटवस्तू घेऊन येतील. व्यवसायात प्रगतीसाठी दिवस शुभ आहे.

**कर्क**
बनवलेल्या योजना आज अंमलात आणणे चांगले. अनुभवी वक्तींकडून तुम्हाला चांगला सल्ला मिळेल.

**सिंह**
आज तुमच्या आजूबाजूचे लोक तुमच्यावर आनंदी राहतील. जुना तणाव आज संपुष्टात येईल.

**कन्या**
या राशीशी संबंधित लोकांना आज आर्थिक लाभ होणार आहे. जो तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**तूळ**
लोकांच्या विचारांमुळे आणि तुमच्याबद्दल सांगितलेल्या गोष्टींमुळे अस्वस्थता वाटू शकते.

**वृश्चिक**
या राशीचे विद्यार्थी आज त्यांच्या अभ्यासात उत्साही असतील आणि अभ्यासात जास्त वेळ घालवतील.

**धनु**
आपली प्रगती पाहून कुटुंबातील सदस्यांनाही हे पाहून आनंद होईल. आज थोड खर्च होऊ शकतो.

**मकर**
आपली अर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत राहील. आज तुमचा दिवस आनंदाचे क्षण घेऊन आला आहे.

**कुम्भ**
दिवस आनंदाचा असेल. आज तुमचे आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले राहील. परिस्थितीची उजळ बाजू पहा.

**मीन**
बिघडलेल्या गोष्टी सुधारत असल्याचे दिसेल, त्यामुळे कामात आत्मविश्वासाची झलक दिसेल.

# मुरबाड तालुक्यातील वारकरी जोपासतोय अनोखं दातृत्व

जनतेच्या कल्याणासाठी भूदान करणारे सोनगावचे ह.भ.प. रमेश भोईर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड, दि. जमीन कोट्यवधी किंमतीला सध्या विकली जात आहेत. जमिनीच्या बादातून सख्खे भाऊ बैरी होताना दिसत आहेत. सध्याच्या कलियुगात मुरबाड तालुक्यातील सोनगावचे ह.भ.प. रमेश शंकर भोईर है आधुनिक विनोबा भावे जनतेच्या कल्याणासाठी भूदान करत आहेत. त्यांच्या या भूदान चळवळीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सध्याच्या बदलत्या परिस्थितीत काळ-वेळ बदलली आहे. एकत्र कुटंब पद्धती लोप पावत चालली असून शहरी भाग-ग्रामीण भाग यातील अंतर कमी होत गेल्याने शहरी संस्कृतीने गावातील भावकी, गावकी, देवकी, विभक्त करून ठेवली आहे. ग्रामिण भागात खाटल्यावर माय व गोठ्यात गाय लोप पावली असून वाढत्या महागाईची धग सर्वांनाच होरपळून काढत आहे. याचा परिणाम गाव, बाधा, पाड्यावर अधिक जाणवू लागला आहे. हेक्टरी एकरावर न एकराचं गुंठ्यावर आल्याने जमिनीला सोन्याचा भाव मिळू लागल्याने नाती गोत्यात येऊ लागली आहेत. जमिनीच्या बारणीवरून भाऊ-बहिण, आई-बाप, आत्या, मावशीचं नातं सातबाराच्या भानगडीत तसेच बाराच्या भावात कधी गेले ते

कळलेच नाही. स्वतःच्या स्वार्थापोटी जमिन जुमल्याच्या वादात मयताला खांदा देण्यासाठी देखील भावकीत प्रेम, आपुलकी अली नसल्याचे सत्य पहावयास मिळत आहे. अशा परिस्थितीत सोनगाव या गावातील ह.भ.प. रमेश शंकर भोईर (वय ५५) यांनी आपल्याकडील जमिन विविध कारणांसाठी दान करून एक आदर्श निर्माण केला आहे. काल आणि आजचा हा शेवटचा दाता आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही, अशी नागरिकांमध्ये चर्चा आहे. सध्याच्या बदलत्या काळात असेही काही अवलिये आहेत की त्यांचे दातृत्व पहाता काल, आज आणि उद्याही दिसून येणार नाहीत किंवा भावी पिढ्यान पिल्यात जन्माला येणार नाहीत यांत शंका नाही. सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेले ११०० लोकसंख्या असलेल्या सोनगाव या गावातील ह.भ.प. रमेश शंकर भोईर (वय ५५) यांनी ३९ गावांतील एक जमिन जुमला असलेला सरळ साधा शेतकरी धसई लघुपाटबंधारे विभागात ६० गुंठे जागा जाऊन प्रकल्प बाधीत शेतकरी असला तरी प्रकल्प बाधीत कागदाचा तुकडा घेऊन कधीही कोणाच्या दारी गेला नाही. गावातील स्मशानभूमीला जागा नसल्याने उघड्यावर अंत्यविधी करावा लागे ही गावाची नड ओळखून स्मशानभूमीला सर्व्हे नं. ३/३ तीन गुठे जागा, शाळेच्या इमारतीसाठीह दान २० गुंठे जागा विनामोबदला, ८० लोकसंख्या असलेल्या व विखुरलेल्या कातकरी समाजाच्या वस्तीसाठी २२ गुंठे जागा, गावात येण्यासाठीच्या रस्त्याला १० गुंठे जामा, पाणी अडवा पाणी जिरवा बंधाऱ्यासाठी २ गुंठे जागा असे गावासाठी सदैव मदतीचा हात देणारे दाता आताच्या युगात तरी सापडणे दुर्मिळ आहे.



## अटल सेतू ते गेटवे जलतरण करून डोंबिवलीतील सात वर्षाच्या संग्राशचा विक्रम



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** संग्राश निलेश निकम (वय ७ वर्षे) याने अटल सेतूपासून गेटवे ऑफ इंडिया या दरम्यान १७ किमी सागरी जलतरण करण्याचा संकल्प केला होता. १८ एप्रिल रोजी पहाटे ३:४५ वाजता, अंगाला ग्रीस लावून आणि समुद्राची पूजा करून संग्राशने अटल सेतूपासून पोहायला सुरुवात केली. अरबी समुद्रात चंद्रप्रकाशाच्या उजेडात त्याने सूर मारला. महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेचे निरीक्षक हिरेन रणपुरा यांच्या देखरेखीखाली त्याचे पोहणे सुरू होते.

समुद्रातील वाढते प्रदूषण, भरती-ओहोटीचा प्रभाव, मोठमोठ्या बोटींमुळे निर्माण होणाऱ्या लाटा, तसेच गेटवे ऑफ इंडिया जवळील पाण्यावरचा तेलाचा थर – या सगळ्यांमुळे त्याला त्रास झालाउलटीसारखे वाटणे, तोंडात खारट पाणी जाणे, आणि प्रवाहाच्या विरुद्ध पोहावे लागणे यामुळे परिस्थिती अधिक कठीण झाली. अंधार असल्यामुळे दूरपर्यंत काही दिसत नव्हते. तरीसुद्धा, संग्राशने जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर एकही विश्रांती न घेता सलग पोहत राहिला. सकाळी ६:५६वाजता तो गेटवे ऑफ इंडिया येथे पोहोचला. म्हणजेच, त्याने १७ किलोमीटरचे अंतर ३ तास ११ मिनिटांत यशस्वीरित्या पूर्ण केले.

गेटवे ऑफ इंडिया येथे पोहोचल्यावर प्रशिक्षक विलास माने, रवी नवले, अरुण, संतोष पाटील, त्याचे आई-वडील आणि नातेवाईकांनी त्याचे उत्साहाने स्वागत केले.केवळ तीन महिन्यांपूर्वी संग्राशचे आई-वडील त्याला पोहायला शिकण्यासाठी यश जिमखाना मध्ये घेऊन आले होते. केवळ आठ दिवसांत त्याने पोहायला शिकून घेतले. तो इतर मुलांचे सराव बघत असे आणि म्हणायचा, "सर, मला पण समुद्रात जायचंय, स्पर्धेत भाग घ्यायचाय.

यानंतर त्याला ॲडव्हान्स कोचिंग सुरू करण्यात आले. एक महिन्यानंतर त्याला उरण येथे संतोष पाटील यांच्याकडे दोन वेळा समुद्रात सरावासाठी नेण्यात आले. तेथे त्याने चांगला सराव केला. सध्या तो प्रशिक्षक विलास माने आणि रवी नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोहण्याचे धडे घेत आहे. यश जिमखानाचे मालक राजू वडनेरकर, मॅनेजर, आणि संपूर्ण स्टाफने संग्राशचे अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## अंबरनाथमध्ये बांधकाम व्यावसायिक विश्वनाथ पनवेलकर यांच्या घरावर गोळीबार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ:** अंबरनाथमध्ये बांधकाम व्यावसायिक विश्वनाथ पनवेलकर यांच्या घरावर गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. आज दुपारी अडीच वाजताच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात हल्लेखोरांनी पनवेलकर यांच्या घरावर दोन गोळया झाडून पळ काढला. यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

अंबरनाथच्या हुतात्मा चौकाजवळ उद्योजक विश्वनाथ पनवेलकर यांचं सीताई सदन नावाचं निवासस्थान आहे. आज दुपारी अडीच वाजताच्या सुमारास पनवेलकर यांच्या घराबाहेर दुचाकीवरून दोन अज्ञात हल्लेखोर आले. त्यांनी पनवेलकर यांच्या घराच्या गेटच्या दिशेने दोन गोळया झाडत तिथून पळ काढला. ही संपूर्ण घटना पनवेलकर यांच्या घराबाहेर असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली. याप्रकरणी आता शिवाजीनगर पोलीस, तसंच क्राईम ब्रँचची टीम घटनास्थळी दाखल झाली असून पोलिसांकडून तपासाला सुरुवात करण्यात आली आहे.

पनवेलकर यांच्या घराबाहेर झालेल्या गोळीबाराचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. १४ सेकंदांच्या फुटेजमध्ये एक दुचाकी वर्दळीच्या रस्त्यावरुन येताना दिसत आहे. ही दुचाकी पनवेलकर यांच्या घराबाहेर येऊन थांबते. याच सुमारास एक रिक्षादेखील रस्त्यावर थांबलेली दिसते. त्यातून ३ महिला उतरत असतात. तितक्यात दुचाकीवरील एक जण बंदूक काढून पनवेलकरांच्या निवासस्थानाच्या दिशेनं २ गोळया झाडतो. हा प्रकार रिक्षातून उतरणाऱ्या महिला पाहतात. त्यांना नेमकं काय घडतंय, ते समजत नाही. पुढच्या काही क्षणांमध्ये अज्ञात हल्लेखोर दुचाकीवरुन पसार होतात. वर्दळीच्या रस्त्यावर हा संपूर्ण प्रकार घडल्यानं खळबळ उडाली आहे.

## आमदार सुलभा गायकवाड यांच्या जनता दरबारात गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेकडील तिसाई हाऊस येथे रविवार, २० एप्रिल रोजी जनता दरबाराचे आयोजन भाजपा आमदार सुलभा गायकवाड यांच्या वतीने करण्यात आले होते. या जनता दरबारात स्थानिक आमदार सुलभा गायकवाड यांनी शिक्षणापासून वंचित न राहण्यासाठी गरजू, गरीब असलेल्या विद्यार्थ्यांना धनादेश देत मदत केली.

जनता दरबारमध्ये लोकांनी, तसेच नागरिकांनी आमदार सुलभा गणपत गायकवाड यांच्या समोर एक एक करून त्यांच्या समस्या सांगितल्या. काहींनी गटार स्वच्छतेबद्दल तक्रार केली, तर काहींनी पाण्याबद्दल तक्रार केली. जनता दरबारात स्थानिक आमदार सुलभा गायकवाड यांनी मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या ऐकल्या आणि त्या शक्य तितक्या लवकर सोडवण्याचा प्रयत्न केला. जाईल असे आश्वासन दिले. छोट्या छोट्या समस्यांसाठी त्यांनी स्वतः अधिकाऱ्यांशी फोनवरून बोलून आणि संबंधित अधिकाऱ्यांना त्या लवकरात लवकर सोडवण्यास सांगितले. मतदारसंघातील महिलांपासून ते वृद्धांपर्यंत, सर्वजण त्यांच्या समस्या घेऊन जनता दरबारात या प्रसंगी आले. असल्याचे दिसत होते.

जनता दरबारा निमित्ताने आमदार सुलभा गायकवाड यांनी महिलांच्या समस्या ऐकून घेतल्या आणि त्या लवकरच सोडवण्याचे आश्वासन दिले. या जनता दरबारा निमित्ताने आमदार सुलभा गायकवाड यांच्या शी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, मतदारसंघातील नागरिकांसाठी दर रविवारी जनता दरबार आयोजित केला जातो, जो माजी आमदार गणपत गायकवाड यांच्या कार्यकाळापासून सुरू आहे. रविवारी जनता दरबारात विविध भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यांनी आपल्या समोर आपल्या समस्या मांडल्या.

## मोफतच्या सीटकव्हरसाठी ठाण्यातील ज्येष्ठास ३६ हजारांचा गंडा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** कारचे सीटकव्हर एकावर एक 'फ्री' च्या ऑफरला भुलून एका ज्येष्ठ नागरिकाने एक हजार रुपये किमतीचे सीटकव्हर मागवले. मात्र, एकच सीटकव्हर मिळाल्याने ज्येष्ठाने संबंधित ई-कॉमर्स कंपनीचा गुगलवरून ग्राहक संपर्क मिळवत या संपर्क क्रमांकावर संपर्क करणे ज्येष्ठाला चांगलेच महागात पडले आहे.

सायबर गुन्हेगारांनी पैसे परत करण्याचे आश्वासन देत ज्येष्ठाकडून ३६ हजार रुपये उकळले असून याप्रकरणी बदलापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. बदलापूर येथे राहणारे ६० वर्षांचे ज्येष्ठ नागरिक ठाण्यातील एका खासगी कंपनीत काम करतात. ई-कॉमर्स कंपनीच्या संकेतस्थळावर कारचे सीटकव्हर एकावर एक फ्री असल्याने त्यांनी एक हजार रुपये ऑनलाइन पैसे देऊन हे सीट कव्हर मागवले. प्रत्यक्षात त्यांना दोन ऐवजी एकच सीटकव्हर मिळाले. ज्येष्ठाने गुगलवर सर्च करून संबधित ई-कॉमर्स कंपनीचा ग्राहक संपर्क नंबर मिळवला.

या नंबरवर संपर्क साधत केवळ एकच सीटकव्हर दिल्याची त्यांनी तक्रार केली. त्यावेळी समोरच्या व्यक्तीने पैसे परत करण्याचे खोटे आश्वासन देत ज्येष्ठाला फोन सुरू ठेवण्यास सांगितले. नंतर त्या व्यक्तीने बोलण्यात गुंतवून त्यांच्याकडून ३६ हजार रुपये ऑनलाइनद्वारे काढून घेतले. पैसे गेल्याचे कळताच ज्येष्ठाने त्या व्यक्तीकडे पैशाची मागणी केली. मात्र, त्याने फोन बंद केला. ज्येष्ठाच्या तक्रारीनंतर आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

## बदलापुरात कार्यान्वित होणार तिसरे अग्निशमन केंद्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, (बातमीदार) :** दरवर्षी १४ ते २० एप्रिल या कालावधीत राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताह साजरा केला जातो. त्या अनुषंगाने बदलापूर पूर्व शिरगाव येथील अग्निशमन दलाच्या कार्यालयातून गुरुवारी (ता. १७) संपूर्ण बदलापूर शहरात जनजागृतीपर रॅली काढण्यात आली. या वेळी वाढत्या बदलापूरसाठी लवकरच तिसरे अग्निशमन केंद्र कार्यान्वित होणार असल्याची माहिती मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी दिली. या वेळी अग्निशमन दलाचे प्रतीक असणाऱ्या ध्वजाचे रोहण मुख्याधिकारी गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रगीताने अग्निशमन दलातील शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अनेक अग्निशमन वीरांचे सन्मान व स्वागत करण्यात आले. आग लागल्यानंतर कोणती काळजी घ्यावी? अग्निशमन

> अग्निशमन सेवा सप्ताह निम्मित मा. श्री मारुती गायकवाड, मा. प्रशासक तथा मुख्याधिकारी यांनी शिरगाव एमआयडीसी अग्निशमन केंद्र येथे भेट दिली. अग्निशमन अधिकारी श्री दामोदर वांगड यांनी त्यांचे स्वागत करीत दलाच्या कामकाजाविषयी माहिती दिली. तसेच मा. प्रशासक तथा मुख्याधिकारी यांच्या हस्ते अग्निशमन दलाचे ध्वजारोहण करण्यात आले व त्यांनी शहीद अग्निशमन जवान स्मुर्ती स्तंभास श्रद्धांजली अर्पित केली. ततपश्चात अग्निशमन दलाच्या परेडचे निरीक्षण करून नव्याने रुजू झालेल्या अग्निशमन जवानांना मार्गदर्शन केले. अग्निशमन अधिकारी यांनी अग्निशमन दलात नव्याने प्राप्त झालेल्या आधुनिक अग्निशमन वाहन - क्विक रिस्पॉन्स वेहिकल (QRV) व उपकरनांची माहिती करून देत वाढत्या शहरीकरणानुसार भविष्यातील अग्निशमन आव्हाने आणि उपाययोजना बाबत चर्चा झाली.

दलाच्या कार्याची पोच म्हणून बदलापूर पूर्व-पश्चिम परिसरात अग्निशमन दलाच्या ताफ्यात असलेल्या गाड्या घेऊन जनजागृती रॅली काढण्यात आली. १९४४च्या बॉम्बे डॉक स्फोटाची आठवण म्हणून हा आठवडा अग्निशमन दल सेवा सप्ताह म्हणून साजरा केला जातो. या स्फोटात आग विझवताना अनेक अग्निशमन कर्मचाऱ्यांना आपले प्राण गमवावे लागले. हा आठवडा त्या नायकांचे स्मरण करण्याचा म्हणून ओळखला जातो. अग्निशमन दल बदलापूर विभागाचे अधिकारी दामोदर वांगड यांनी आम्ही आपल्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर आहोत. मात्र, आगीच्या घटनेच्या वेळी आणीबाणीच्या प्रसंगी, आपण एकजूट होऊन काम केले पाहिजे, असे सांगितले.

### अद्ययावत गाड्या लवकरच ताफ्यात

वाढणाऱ्या बदलापूर शहरात अग्निशमन दलाचे तिसरे केंद्र लवकरच सेवेत दाखल होत आहे. यासाठी आवश्यक अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त गाड्या व यंत्रणा अग्निशमन दलाच्या ताफ्यात लवकरच दाखल होणार असल्याची माहिती मुख्याधिकारी गायकवाड यांनी दिली.

## शासनाने पिओपी वरील बंदी हटवावी गणेशमूर्तीकारांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** प्लास्टर ऑफ पॅरीसच्या गणेशमूर्तीवरील बंदी मुळे पेण शहरासह ग्रामीण भागातील हमरापूर विभागातील गणेश मूर्तीकारांची मोठी कोंडी होत आहे. प्लास्टरच्या मूर्त्यांबाबत संभ्रम कायम असल्याने तयार झालेल्या लाखो गणेशमूर्त्यांचे करायचे काय? असा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला आहे. भक्तांच्या हाकेला धावणाऱ्या विघ्नहर्त्या वरच पिओपी बंदी चे महा 'विघ्न' आले आहे, त्यामुळे संपूर्ण जगाला मूर्ती पुरविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील पेणकर गणेशमूर्तीकारच मानसिक तणावाखाली दिसत आहेत. पेण शहरासह तालुक्यातील हमरापूर, जोहे, कळवे, दादर, उंबर्डे, शिर्कि, गडब व आसपासच्या परिसरात गणेशमूर्ती तयार करण्याचे काम वर्षभर सुरू



असते. पेण शहर आणि हमरापूर जोहे परिसरात गणेशमूर्ती तयार करणाऱ्या पाचशेहून अधिक कार्यशाळा आहेत. ज्यामधून दरवर्षी सुमारे ३० लाख गणेशमूर्ती तयार केल्या जातात. नंतर त्या देशाविदेशात पाठवल्या जातात. दरवर्षी या व्यवसायातून ७० ते ८० कोटी रुपयांची उलाढाल होत असते. या व्यवसायामूळे २५ हजार लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होतो. राज्यात लागणाऱ्या एकूण गणेशमूर्तीपैकी जवळपास ६० टक्के गणेशमूर्ती संपूर्ण पेण तालुक्यात बनविण्यात येत असून त्या तयार केल्या जातात. दसऱ्याच्या शुभमुहूर्ता पासून दहा ते पंधरा दिवसांनी पेण मध्ये गणेशमूर्ती तयार करण्याच्या कामाला सुरूवात होते. हे काम वर्षभर सुरू असते. यावर्षीही मोठ्या प्रमाणात गणेशमूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. हमरापूर जोहे व पेण शहर परिसरात लाखो पिओपीच्या गणेशमूर्ती तयार झाल्या आहेत. त्यांचे रंगकाम, गोल्डन आणि आखणी शिल्लक आहेत. मात्र कोर्टाने आदेश दिलेल्या पिओपी मूर्तीवरील बंदीमूळे आता तयार झालेल्या गणेशमूर्तीचे करायचे काय? हा गंभीर प्रश्न पेणसह राज्यातील मूर्तीकारांना भेडसावत आहे.पीओपी गणेशमूर्तीसाठीच पेणचे मूर्तिकार आग्रही का.... पिओपीच्या गणेशमूर्ती या टिकाऊ आणि वजनाला हलक्या असतात. कमी वेळात जास्त मूर्ती तयार करणे सहज शक्य होते. लांब पल्ल्याच्या वाहतुकीसाठी पीओपीच्या गणेश मूर्ती उपयुक्त ठरतात. मूर्तीची सुबकता चांगली असते. किमतीलाही या मूर्ती शाडूच्या गणेशमूर्तीच्या तुलनेत अर्ध्या किमतीत म्हणजे खूप स्वस्त पडतात, मातीच्या गणेशमूर्ती या वजनाला जड, हाताळायला नाजूक आणि बनवायला अधिक परिश्रमाच्या असतात. पिओपीच्या तुलनेत शाडूची मूर्ती घडवण्यासाठी लागणारा वेळही जास्त असतो. कोर्टाने व शासनाने पिओपी गणेश मूर्तीवरील बंदी हटवावी अशी मागणी गणेशमूर्ती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे .


# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

## उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

-: नोटीस :-

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | व्योमन इंडिया प्रा. लि. | स.नं. ४६/२, ४६/३, ५१/१२, मौजे-वडवली, ता. कल्याण | २१ | १८ मी. रुंद डी. पी. रस्त्याचे कामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत.

तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

*जावक क्रमांक :-
कडोंमपा/जसवि/मुका/62
दि. 21/04/2025

सही/-
(संजय जाधव)
वृक्ष अधिकारी, वृक्ष प्राधिकरण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.


## पोलिस ठाण्यातील तक्रार निवारणासाठी नागरीकांनी भेट देण्याचे आवाहन !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद** नागरीकांच्या असलेल्या समस्या व तक्रारी निवारणासाठी पडघा, भिवंडी तालुका व गणेशपुरी या पोलिस स्टेशनमध्ये दिलेल्या वेळेत भेट द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. गणेशपुरी पोलिस उपविभागीय अधिकारी अंतर्गत असलेल्या भिवंडी तालुका, पडघा, गणेशपुरी या पोलिस ठाण्यात भिवंडी ग्रामीण भागातील पडघा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झालटे हे नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी तसेच तक्रारींच्या निवारणासाठी कार्यालयात प्रत्येक सोमवार ते शनिवार सकाळी 11 ते दुपारी 02 वाजे पर्यंत हजर असणार आहे. त्यामुळे या असलेल्या समस्या व तक्रारी निवारणासाठी नागरिकांनी दिलेल्या वेळेत त्यांच्या पोलिस ठाणे कार्यालयात भेट द्यावी असे आवाहन करण्यात आले असल्याची माहिती पडघा पोलिस स्टेशन पोलिस सुत्रांनी दिली.

## कर्जत मधील महिलांचा पाण्यासाठी हंडा मोर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कर्जत, ता. २१ (बातमीदार):** कर्जतमधील नाना मास्तर नगर परिसरातील पाणी समस्या गेली अनेक वर्षे नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहणारी ठरत आहे. वेळेवर पाणी न मिळणे, पाणी कमी दाबाने येणे आणि पुरेसे पाणी न मिळणे यामुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. अनेकदा तक्रारी करूनही नगरपालिकेकडून याकडे वारंवार दुर्लक्ष झाल्याने अखेर या संतप्त नागरिकांनी सोमवारी (ता. २१) आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. संतप्त महिला हंडे घेऊनच नगरपालिकेत गेल्याने प्रशासनात गोंधळ उडाला होता. हंडा मोर्चा काढत महिलांनी जलद आणि ठोस उपाययोजनांची मागणी करीत प्रशासनाला जाब विचारला. अचानकपणे आलेल्या या मोर्चामुळे पालिकेच्या प्रशासनाचा गोंधळ उडाला.कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी नुकताच पदभार स्वीकारला असला तरी पाणी विभागाचे अभियंता अभिमन्यू एरवडे यांच्याकडून कामात हलगर्जी होत असल्याचा आरोप महिलांनी केला.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे ■ मंगळवार ■ 22 एप्रिल 2025



jeevandeepvartanews2020@gmail.com

# देखभालीच्या कामामुळे सीएनजी पुरवठ्यात व्यत्यय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** अंबरनाथला गॅस पुरवठा करणाऱ्या गेल पाइपलाइनवरील देखभालीच्या कामामुळे, या प्रदेशातील महानगर गॅस लिमिटेडच्या टर्मिनलला गॅस पुरवठ्यावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. परिणामी, अंबरनाथ, बदलापूर, कल्याण आणि डोंबिवली येथील काही सीएनजी स्टेशनना गॅस पुरवठा तात्पुरता थांबवण्यात आला आहे. गेलची टीम ही समस्या लवकरात लवकर सोडवण्यासाठी सक्रियपणे काम करत आहे. तथापि, पुनर्संचयित होण्यास अंदाजे ४-५ दिवस लागतील अशी अपेक्षा आहे. एमजीएल त्यांच्या घरगुती आणि व्यावसायिक पीएनजी ग्राहकांना कोणत्याही व्यत्ययाशिवाय प्राधान्याने पुरवठा सुरू राखण्याची खात्री करत असून झालेल्या गैरसोयीबद्दल खेद व्यक्त केला आहे.



# खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्याचे आवाहन

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**ठाणे,दि.21 :-** कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या (प्रतिबंध मनाई अणि निवारण) अधिनियम 2013 (Posh Act) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी Posh Act 2013 मधील कलम 4 अन्वये ज्या कार्यालयामध्ये 10 किंवा 10 पेक्षा जास्त कर्मचारी असतील अशा सर्व खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. व सदरच्या आस्थापेनेतील अंतर्गत तक्रार समितीची नोंदणी SHE BOX PORTAL वर नोंदणी करण्यासाठी केंद्र शासनाचे निर्देश आहेत.

त्यासाठी ठाणे जिल्ह्यातील सर्व खाजगी आस्थापनांनी SHE BOX PORTAL वर नोंदणी करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संतोष भोसले यांनी आवाहन केले आहे.

SHE BOX पोर्टवर खाजगी आस्थापनेतील अंतर्गत तक्रार समिती नोंदविण्याची कार्यपध्दती खालील प्रमाणे SHE Box पोर्टलवर अंतर्गत तक्रार समिती नोंदविण्यासाठी https://shebox.wcd.gov.in या वेबसाईटवर जाऊन होम स्क्रीनवर दाखविल्याप्रमाणे अंतर्गत तक्रार समिती नोंदवा (Private Head Office Ragistration) या टॅब वर Click करुन आवश्यक त्या सर्व महितीचा तपशिल भरुन Submit या Tab वर Click करुन अंतर्गत तक्रार समितीची महिती नोंदवता येईल, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संतोष भोसले यांनी कळविले आहे.

# महाराष्ट्रात हिंदी भाषा सक्तीकरणाला उल्हासनगर मनसेचा विरोध

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :**सध्या केंद्र सरकारकडून महाराष्ट्रात होणाऱ्या हिंदी भाषेच्या सक्तिला महाराष्ट्र नवनिर्माण सेना कडाडून विरोध करत आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या नुसार नवीन अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची अंमलबजावणी होतेय. राज्यात नवीन शैक्षणिक वर्ष सन २०२५ - २६ पासून टप्प्याटप्प्याने करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १६ एप्रिल २०२५ रोजी शासन निर्णय पारीत केलाय.

यापुढे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य करण्यात येणार आहे.व याला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा ठाम विरोध आहे.एक तर तिसरी भाषा पहिलीपासून अनिवार्य करू नये आणि करायचीच असेल तर आधी उत्तरेकडील व दक्षिणेकडील राज्यांनां मराठी किंवा एखादी द्रविडी भाषा अनिवार्य म्हणून शिकवायला सुरुवात करावी व ती झाल्यानंतच महाराष्ट्रात हिंदी भाषा सक्तीची करावी.अशी भुमिका उल्हासनगर महाराष्ट्र नवनिर्माण जिल्हा अध्यक्ष बंडू देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

.आज महाराष्ट्रात हिंदीच्या प्रसारापेक्षा मराठी भाषेच्या प्रसाराची जास्त गरज असल्याचे मनसे उल्हासनगर शहराध्यक्ष संजय घुगे यांनी सांगितले. यावेळी, उपजिल्हा ध्यक्ष प्रदिप गोडसे, उपशहर अध्यक्ष मुकेश शेठपलांनी, ,काकोळे चे सरपंच नरेश गायकर, कैलास घोरपडे, अक्षय धोत्रे, कैलास वाघ, देवा तायडे, विक्की जिप्सन, सन्नी रोकडे, मनविसे शहर अध्यक्ष वैभव कुलकर्णी, रस्ते आस्थापना महानगर संघटक मैनुउद्दीन शेख, वाहतूक सेना शहर संघटक काळू थोरात इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दारुसाठी ऑटोरिक्षाची चोरी
## कल्याण पूर्वेतील एसी मेकॅनिकचा प्रताप

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●




**कल्याण :** दारू आणण्यासाठी पैसे नसल्याने कल्याण पूर्वेत एका एसी मॅकेनिकने चक्क रिक्षा चोरी केली असून कोळसेवाडी पोलिसांनी या एसी मेकॅनिकला अटक केली आहे. प्रांजल बर्वे असे या आरोपीचे नाव आहे. याने दारु आणण्यासाठी रिक्षा चोरली. सीएनजी संपल्यावर रिक्षा एका ठिकाणी सोडून पसार झाला. अखेर सीसीटीव्हीच्या सहाय्याने रिक्षा हस्तगत केली आहे.

कोळसेवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत 18 एप्रिल रोजी रात्रीच्या वेळी, जिम्मी बाग, कर्पेवाडी कल्याण पुर्व येथे फिर्यादी राजेश मेहुलीया यांची रहात्या घरासमोर उभी केलेली रिक्षा ही अज्ञात इसमाने चोरी करून नेली म्हणुन कोळसेवाडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या दाखल गुन्हयाच्या तपासात गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक माहीती व गुप्त बातमीदारांमार्फत माहीती काढून कौशल्यपुर्ण तपास करून अनोळखी आरोपी निष्पन्न करून रेकॉर्डवरील आरोपी प्रांजल बर्वे याला चोरी केलेल्या रिक्षा सह शिताफीने पकडून सोमवारी अटक केली आहे. त्याच्याकडून गुन्हयातील चोरी केलेली ६५ हजार रू. किमतीची रिक्षा जप्त केली आहे.

ही कारवाई पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे, व सहा. पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे वपोनिरी. गणेश न्हायदे, सहा.पो.निरी. दर्शन पाटील, संदीप भालेराव, पोहवा बुधवंत, जाधव, भामरे, वाघ, सौंदाणे, जरग, कापडी, पोशि सोनवळे, सोनवणे यांच्या पथकाने केली आहे.

# शिवनेरी किल्ल्यावर पुन्हा एकदा पर्यटकांवर मधमाशांचा हल्लाबोल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पुणे :** शिवनेरी किल्ल्यावर पुन्हा एकदा पर्यटकांवर मधमाशांनी हल्लाबोल केला आहे. या हल्ल्यात १६ जण जखमी झाले असून पाच बालकांचा यात समावेश आहे. या आधीही शिवनेरीवर चार वेळा अशाप्रकारचा हल्ला मधमाशांनी पर्यटकांवर केला होता.

पुण्यातील शिवनेरी किल्ल्याचा इतिहास सर्वदूर पसरलेला आहे. शिवनेरी किल्ल्यावर सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक पर्यटनासाठी येतात. शुक्रवार, शनिवार, रविवार या जोडून आलेल्या सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांनी शिवनेरी किल्ल्यावर पर्यटन करण्यास पसंती दर्शवली. रविवारी पर्यटकांची तुलनेने जास्त गर्दी होती. या गर्दीत मोठ्यांसह लहानांचा देखील समावेश होता. रविवारी सकाळच्या सुमारास पर्यटनाचा आनंद घेणाऱ्या पर्यटकांवर झाडावर असलेल्या मधमाशांनी हल्ला केला. या हल्ल्यात १६ पर्यटक गंभीर जखमी झाले. या मध्ये पाच लहान मुलांचा देखील समावेश आहे. सकाळी मधमाश्यांच्या हल्ल्याच्या घटनेनंतर काही काळ शिवभक्तांना किल्ल्यावर जाण्यासाठी मज्जाव करण्यात आला होता. सकाळी झालेल्या घटनेची व्याप्ती पाहता, पुन्हा लगेच कोणावर हल्ला होऊ नये, यासाठी किल्ला दोन वाजेपर्यंत बंद करण्यात आल्याचे पुरातत्व विभागाकडून सांगण्यात आले. या आधीही चार वेळा मधमाशांनी पर्यटकांवर अशाप्रकारचा हल्ला केला होता. या हल्ल्याचं कारण अद्यापही अस्पष्ट आहे. दरम्यान जखमींना जुन्नरच्या छत्रपती शिवाजी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

**मधमाशांना त्रास न देताही मधमाशा हल्ला का करतात. ?**

चहू बाजूंनी झाडांची दाटी असलेल्या आणि शांतता असलेल्या ठिकाणी कुठे ना कुठे मधमाशा वावरत असतात. फुलांच्या आतील रस शोषून आपल्या घरट्याची बांधणी करतात. मधमाशांना जर त्रास दिला तर त्या चवताळतात आणि आजूबाजूला असलेल्या माणसांना दंश करतात. त्यांच्या दंशाने शरीराला इजा होऊ शकते. जंगल, गडकिल्ले अशा ठिकाणी मधमाशांचा वावर जास्त प्रमाणात असतो. म्हणून गडकिल्ल्यांवर जाताना परफ्यूम, अत्तर सारखे सुगंधीत द्रव्ये अंगाला लावणे टाळा.

परफ्यूम, अत्तरच्या सुवासाने मधमाशा आकर्षित होऊन दंश करतात. तसेच गडकिल्ल्यांसारख्या शांत ठिकाणी आरडाओरडा करणे टाळा, शेकोटी सदृश्य कोणतीही जाळपोळ करू नका, सिगरेट सारखे धूम्रपान टाळा. आगीच्या धुराने मधमाशा चवताळतात त्या सैरावैरा होऊन हल्ला करतात. अशा वेळी घाबरून न जाता गडकिल्ल्यांवर जाताना सोबत एक चादर जवळ ठेवा, त्याचबरोबरीने प्रथमोपचाराचे साहित्य देखील जवळ बाळगा.

### 'वरद व्हीजन' च्या उद्घाटना निमित्त
# कराओके गायन स्पर्धेस चांगला प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी

**कल्याण :** 'वरद व्हीजन एंटरटेनमेंट' प्रस्तुत नृत्य-अभिनय अॅकेडमीच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्त व्यवस्थापकीय संचालक शशिकांत गांगण यांनी कराओके गायन स्पर्धेचे आयोजन नुकतेच केले होते.

या स्पर्धेत परिसरातील गायकांनी उत्स्फूर्त सहभाग दर्शवला. त्यात प्रथम पारितोषिक ( रु.३१११ व सन्मानचिन्ह) सुरेश शेट्टी यांनी पटकावले. द्वितीय पारितोषिक (रु.२१११ व सन्मानचिन्ह) दक्षा कांबळे व आरोही घाणेकर यांना विभागून देण्यात आले,तर तृतीय पारितोषिकाचे मानकरी (रु.१११११ व सन्मानचिन्ह) नंदेश पांचाळ ठरले.

कार्यक्रमाची सुरुवात मोहिनी दुखंडे संचालिका, आधार नॅशनल डेव्हलपमेंट सेंटर, मुंबई आणि पत्रकार अनघा पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नियोजन अध्यक्ष : पर्यटन, कला आणि सांस्कृतिक महोत्सव समिती, महाराष्ट्र शासन डॉ. अमित अनंत दुखंडे आणि प्रसिद्ध मिमिक्री कलाकार आशिष सातपुते उपस्थित होते. डोंबिवलीचे माजी नगरसेवक नंदू मालवणकर, जोंधळे विद्या समूहाचे माजी मुख्याध्यापक मगन सूर्यवंशी, ढोकळे ट्युटोरियल्सचे संचालक ढोकळे या मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. वरद व्हीजन एंटरटेनमेंटने या माध्यमातून परिसरातील विद्यार्थ्यांना अभिनय आणि नृत्य क्षेत्रात प्रगतीसाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ निर्माण करून दिले आहे.

# अतिक्रमण झालेल्या तलावांचे पुनरुज्जीवन होईल?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबईच्या उत्तर भागातील विस्मृतीत गेलेल्या आणि अतिक्रमणांखाली दबलेल्या ११ तलावांना पुन्हा मोकळा श्वास देण्याची घोषणा केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी केली आहे. पण खरा प्रश्न असा आहे की, ही घोषणा आहे की नेहमीसारखं आश्वासन? २०२२ मध्येही अशीच योजना आली होती, पण कागदांवरच विरून गेली. मग यावेळी काय वेगळं घडणार?

गोयल म्हणाले, "उत्तर मुंबईतील ११ तलाव अतिक्रमणांमुळे नामशेष झाले आहेत. पण पुढील दोन वर्षांत हे तलाव पुन्हा जिवंत केले जातील आणि सौंदर्यीकरणाच्या माध्यमातून लोकांसाठी खुले केले जातील." या योजनेत मालवणीतील लोटस तलाव, गोराईतील सुमलई तलाव, मढमधील वानाला, पोसाई, हरबादेवी, धारवली तलाव आणि मनोरीमधील कजरादेवी तलाव यांचा समावेश आहे.

महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले की, उपआयुक्त किरण दिघावकर यांच्या नेतृत्वाखाली यावर्षीच्या सुरुवातीलाच या तलावांची पाहणी करून एक कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. अधिकाऱ्यांच्या मते, या प्रकारच्या प्रकल्पात स्थानिक नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण दीर्घकालीन देखभालीसाठी जनतेचा विश्वास आणि सहभाग गरजेचा आहे.

**दोन टप्प्यांत होणार काम**

हा संपूर्ण प्रकल्प दोन टप्प्यांत पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात गर्दीचे प्रमाण जास्त असलेले, किंवा जिथे खर्च आणि गुंतागुंत कमी आहे असे तलाव आधी पुनरुज्जीवित केले जातील. यानंतर दुसऱ्या टप्प्यात उर्वरित तलावांचे काम हातात घेतले जाईल.

'प्रोजेक्ट मुंबई' या संस्थेचे संस्थापक शिशिर जोशी यांनी सांगितले की, "आपण अशा तलावांवर आधी लक्ष केंद्रित करू जे लवकर पुनरुज्जीवित करता येतील. उदाहरणार्थ, झाडांची सावली, छोटं अम्फीथिएटर, चांगली लाईट व्यवस्था, यामुळे लोक त्या परिसरात येतील. मात्र गटार आणि स्वच्छतेसारख्या प्रश्नांसाठी पालिकेने पूर्णपणे पुढे यावे लागेल."

२०२२ मध्येही पालिकेच्या पी उत्तर विभागात १८ तलावांचा विकास करण्याचा प्रस्ताव होता. पण तो प्रस्ताव पुढे सरकू शकला नाही. मात्र यावेळी खासदार स्वतः पुढे आल्यामुळे, अधिकाऱ्यांना दोन वर्षांचा ठराविक कालावधी देण्यात आला आहे, दरम्यान, पुनरुज्जीवन ही केवळ स्थापत्य नव्हे, तर लोकांच्या आठवणी, निसर्गाशी नातं आणि सांस्कृतिक जडणघडण पुन्हा उभी करण्याची संधी आहे. मात्र, प्रश्न एकच आहे. यावेळी खरंच हे घडणार का? की पुन्हा एकदा तलावांचं नशीब फक्त फाइलींमध्येच अडकून राहील?

# सेवा हक्क दिनानिमित्त विविध उपक्रम राबवा
## जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे आवाहन




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड दि.21:-**एप्रिल रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंमलबजावणीस 10 वर्षे पूर्ण होत आहेत. त्या औचित्याने अधिनियमाच्या जनजागृतीसाठी 28 एप्रिल हा दिवस जिल्हा व ग्रामस्तरावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन सेवा हक्क दिन साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी रविंद्र शेळके, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रियदर्शनी मोरे, जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या सहायक आयुक्त अमिता पवार, तहसिलदार शितल रसाळ, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी निलेश लांडगे तसेच जिल्हाधिकारी शासकीय विभागाचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, राज्यातील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक गतीमान व कालबध्द पध्दतीने देण्याकरिता 28 एप्रिल 2015 रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,2015 अंमलात आला आहे. या अधिनियमांतर्गत 969 सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून त्यापैकी 536 सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत. अधिनियमाचा प्रभावी वापर झाल्यास नागरिकांचे जीवन सुकर करण्यास मदत होईल. अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घरपोच सेवा देणारा सेवादूत उपक्रम, ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रामार्फत शासनाच्या सर्व विभागांच्या अधिसूचित सेवा उपलब्ध करुन देणे, सर्व शासकीय कार्यालयांत व आपले सरकार केंद्रांवर सेवा शुल्क व कालमर्यादा यांची माहिती देणारे व तक्रार नोंदविणेसाठी क्यू आर कोड उपलब्ध करुन देणे, आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणे, उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव करणे आदी उपक्रम जिल्ह्यांमध्ये राबवावेत अशा सूचना जिल्हाधकारी यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

सेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचण्याची प्रभावी अंमलबजावणी करावी अशा सूचना देऊन सर्व सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवणे म्हणजेच खऱ्या अर्थाने नागरिकांचे जीवनमान सुकर करण्यास मदत होणार असल्याचे जिल्हाधिकारी श्री.जावळे यांनी यावेळी सांगितले.

# कैऱ्या तोडण्याच्या वादात चाकूहल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:** पश्चिमेकडील जोशी बाग परिसरात कैऱ्या तोडण्यास गेलेल्या मुलांचा दुसऱ्या मुलांच्या टोळक्याशी वाद झाला. या वादातून संतापलेल्या एका गटाने भररस्त्यात दुसऱ्या गटातील मुलाच्या वडिलांवर चाकूने हल्ला केला. रायसिंग खुशवाह असे त्यांचे नाव आहे. जोशीबाग परिसरात राहणारे खुशवाह पाणीपुरीचा व्यवसाय करतात. त्यांचा लहान मुलगा शनिवारी काही मित्रांसोबत कैऱ्या तोडण्यासाठी गेला होता. यावेळी त्याचा दुसऱ्या गटातील काही मुलांशी वाद झाला.

या वादानंतर संतापलेले तरुण खुशवाह यांच्या पाणीपुरीच्या हातगाडीजवळ आले. त्यांनी खुशवाह यांच्याकडे त्यांच्या मुलाची तक्रार करत त्यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यातील एकाने चाकूने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात खुशवाह जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी महात्मा फुले पोलिसांनी तपास सुरू केला असून हल्ला करणारे आरोपी अल्पवयीन असल्याचे समजते.



# भाजपा डोंबिवली पश्चिम मंडल अध्यक्ष पदी पवन पाटील

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली पश्चिमे मधील भाजप कार्यकर्ते पवन पाटील यांची डोंबिवली पश्चिम मंडल अध्यक्ष पदी निवड झाली आहे. भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आणि डोंबिवलीचे आमदार रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात पार पडलेल्या मंडल अध्यक्ष निवडणूकीत रवींद्र चव्हाण यांचे विश्वासू, तरुण तडफदार आणि आपल्या कार्यशैलीने वरीष्ठांना दखल घ्यायला लावणारे पवन पाटील यांची पश्चिम मंडल अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे.

पवन पाटील आणि त्याच्या पत्नी भाजप पक्षात सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. रक्तदान शिबीर, आधारकार्ड नोंदणी, नवीन मतदार नोंदणी, महिलांसाठी हळदीकुंकू असे विविध कार्यक्रम त्यांनी राबवले असून कोविड काळात सुद्धा पवन पाटील डोंबिवली मधील नागरिकांना मदत केली आहे. दरम्यान डोंबिवली पश्चिम मंडल अध्यक्ष पदी निवड झाली म्हणून पाटील यांनी पक्षातील वरिष्ठ, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचे आभार मानले आहेत.

# महावितरणच्या नव्या इलेक्ट्रॉनिक मीटरला नागरिकांचा आक्षेप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी डोंबिवली विभागीय कार्यालयातर्फे नवीन इलेक्ट्रॉनिक TOD मीटर बसवण्यासंदर्भात येथील गृहनिर्माण सोसायट्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सोसायटीच्या चेअरमन आणि सचिव यांना नोटीस पाठवण्यात आलेल्या आहेत. मात्र, सदर कार्यपद्धतीबाबत आक्षेप असून याबाबत विचारणा केली असून नागरिकांनी याविषयावर नापसंती व्यक्त केली.

या विषयी येथील कार्यकारी अभियंता यांना निवेदन दिले. यावेळी त्यांनी अनेक प्रश्नांची सरबत्ती केली आहे. यामध्ये इलेक्ट्रॉनिक TOD मीटर म्हणजे नेमके काय आहे? त्याचे कार्य, फायदे आणि गरज आहे का? RDSS ही योजना काय आहे आणि या योजनेंतर्गतच मीटर



बसवले जात आहेत का? मीटर ही व्यक्तीगत मालकीची संपत्ती असल्यामुळे, त्यासंदर्भातील नोटीस थेट संबंधित ग्राहकास वैयक्तिकरित्या पाठविणे आवश्यक आहे का सोसायटीला नोटीस पाठवणे चुकीचे आहे. नवीन मीटर बसविताना त्याची संपूर्ण माहिती, अटी व नियम, धोरणे इत्यादी ग्राहकास लिखित स्वरूपात देण्यात आले नाही. या नवीन मीटरसाठी भविष्यात कोणतेही वाढीव शुल्क अथवा डिपॉझिट आकारले जाणार आहे ? तसेच हे मीटर बसवणे ग्राहकांसाठी सक्तीचे आहे की ऐच्छिकनहे स्पष्ट करावे.

यामुळे प्रक्रियेबाबत महावितरणने आधी जनजागृती मोहीम राबवावी आणि त्यानंतरच ग्राहकांची वैयक्तिक संमती घेऊन कार्यवाही करावी असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख राहुल भगत, माजी संपर्कप्रमुख अरविंद बिरमोळे, माजी परिवहन सभापती सुधीर पाटील, प्रदीप हाटे, माजी नगरसेवक भालचंद्र म्हात्रे , जिल्हाधिकारी प्रतिक पाटील , उपजिल्हाधिकारी परेश काळण, विधानसभा अधिकारी आदित्य पाटील, युवासेना डोंबिवली सचिव मंदार गुरव ल, उपशहर अधिकारी सुदर्शन जोशी, विभागप्रमुख अशोक पगारे, मंगेश मोरे, उपविभागप्रमुख किशोर सोहनी, विलास नायर , शाखाप्रमुख अभय दिघे, माजी विभागप्रमुख राजू नलावडे , माजी शाखाप्रमुख मंदार स्वर्गे, जेष्ठ शिवसैनिक दिलीप साळवी, सुनील साळगांवकर, मनोहर पाटील, स्वप्निल पाटील आदी उपस्थित होते .

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com